279

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी
करआकारणी व करसंकलन विभाग
क्रमांक : कर/२/कावि/१३ ३४ /१९९०
दिनांक: १९/१२/१९९०.

विषय : महाराष्ट्र [मोठ्या निवासी जागा असलेल्या] इमारतीवरील कर [पुन्हा अधिनियम करणे] अधिनियम १९७६.
फ्लोअरेज टॅक्स आकारणीबाबत.......................

परिपत्रक,

महाराष्ट्र शासनाचे राजपत्र सोमवार दि. ३१.७.१९८९ भाग ४ब मध्ये वरील अधिनियमान्वये फ्लोअरेज टॅक्स पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील निवासी इमारतींना लागु करणेबाबतची अधिसूचना, महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याकडील क्र.आरएन १०८८/सीआर-१८४/युडी-२० दि. ३१ जुलै १९८९ अन्वये प्रसिध्द केलेली आहे. या अधिसूचने अन्वये तदरचा कर दि. १.८.१९८९ पासून बसविलेला आहे.

या कायद्यातील तरतुदीप्रमाणे हा कर बसविणेचा आहे. त्याबाबत खुलासा खालीलप्रमाणे :-

कलम २ मधील व्याख्येचे अवलोकन व्हावे व त्याप्रमाणे त्या व्याख्या लक्षात घ्याव्यात. यामधील महत्वाच्या व्याख्या [ई] इमारत, [म] करयोग्यमूल्य, [ओ] निवासी जागा या मुख्यत्वेकरुन पाहण्यात याव्यात.

कलम ३ = या कलमामधील तरतुदीप्रमाणे म.न.पा. हद्दीत असलेली कोणतीही निवासी जागा जर तिचे क्षेत्र १५० चौ.मीटर पेक्षा अधिक आणि तिचे करयोग्यमूल्य रु. १,५००/- पेक्षा अधिक असेल तर हा कर बसविण्यात येऊन वसूल करता येतो. या कलमातील उपनियम २ अन्वये अनुसूचिमध्ये दर्शविलेल्या दराप्रमाणे म्हणजे करयोग्यमूल्याच्या १५% हा कर बसविण्याची तरतूद आहे.

कलम ४ = या कलमान्वये वरील ३ प्रमाणे बसविलेला कर प्रत्यक्ष भोगवटादार त्या इमारतीचा मालक असेल तर त्या मालकाकडून वसूल करता येईल व जर त्या इमारतीमध्ये जागा भाड्याने दिलेली असेल तर भाडेकरुकडून वसूल करता येईल. मात्र हा वापर फक्त एकाच कुटुंब करीत असले पाहिजे.

कलम ५ = या कलमान्वये कलम ४च्याउपबंधान्वये कर वसूल करण्याकरिता ज्या कालावधीसाठी कर दिला असेल त्या कालावधीमध्ये ती स्वतः त्या जागेचा भोगवटा करीत नसेल कर तिची अशी जागा पूर्वोत्तर कालावधीत प्रत्यक्ष ज्याच्या भोगवट्यात होती त्या व्यक्तीकडून कराची रक्कम मिळविण्याचा हक्क आहे व असा रक्कमेला भाड्यामध्ये वाढ झाली असे समजण्यात येणार नाही.

कलम ६ = कलम ५ अन्वये कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क कोणत्याही व्यक्तीस असा रकमेच्या वसुलीसाठी तिला अशी रक्कम जिच्याकडून मिळविण्याचा हक्क आहे [भाडेकरु]अशा व्यक्तीकडून ती देत असलेल्या भाड्याप्रमाणेच हा कर वसूल करण्याचा अधिकार आहे.

या वरील सर्व बाबींचा विचार करता अशी कोणतीही इमारत जर तिचे क्षेत्र १५० चौ.मीटरपेक्षा जास्त आहे आणि तिचे करयोग्यमूल्य रु. १,५००/- पेक्षा जास्त आहे व तिचा वापर जर फक्त निवासासाठी एकाच कुटुंबाकरिता होत असेल तर ती मिळकत या करास पात्र आहे.

महायक आयुक्त [करसंकलन]
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

प्रति,
मंडलाधिकारी. विभाग